# तोरण

अंक ९४ जानेवारी ते मार्च २०१३


## अनुक्रमणिका


- संपादकीय
- शेती ही मोठी बाजारपेठ आहे याचे भान शेतकऱ्याला हवे....
- त्यांची गोष्टच वेगळी
- अंतरातील घडामोडी


देणगी मूल्य : रु. ५/-

## संपादकीय

### जागतिकीकरण व महाराष्ट्रातील दूध व्यवसाय – एक दृष्टीक्षेप

१९९२ मध्ये झालेल्या जागतिकीकरणाच्या परिणामामुळे विकसित देशांना विकसनशील देशांचा बाजार सहजपणे खुला झाला. त्यांच्या उत्पादन क्षमतेच्या तुलनेत आपल्याकडील लहान शेतकऱ्यांचा व पशुपालकांचा निभाव लागणे अवघडच आहे. त्यांना कदाचित शहरांकडे धाव घेण्याशिवाय पर्यायच राहणार नाही. परंतु मध्यम शेतकरी व पशुपालक यांना जी तारेवरची कसरत करावी लागेल त्यात ते टिकू शकतील का? दूध उद्योगात युरोपियन मुक्तसंघ व्यापार करार जर आणला गेला किंवा मान्य झाला तर काय होऊ शकेल याबद्धलचे विचार पुढे मांडले आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरी कोणत्याही अर्थाने राज्यातले अगदी गरीब शेतकरी नक्कीच नाहीत. तरीसुद्धा दूध उद्योगातून त्यांचे थेंब थेंब शोषण करून त्यांना बाहेर फेकले जात आहे. शेती व्यवसायामध्ये दूध व्यवसाय हा सामाजिक स्तर उंचावणारा म्हणून त्याकडे पहिले जाते.

जर कुणी डेअरीचा धंदा करत असेल तर सर्वसाधारणपणे त्याकडे ''प्रगती'' म्हणून पाहिले जाते. एकीकडे सरकार डेअरी धंद्याला प्रोत्साहन देत आहे तर दुसरीकडे असे दिसून येते कि लहान व मध्यम शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेऊन धंदा वाढवणे भाग पडत आहे किंवा हा धंदा सोडूनच द्यावा लागतो आहे. ही परिस्थिती नीट समजून घेण्यासाठी आम्ही हा अहवाल तयार करण्याचा काळात राज्यातल्या दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांबरोबर तसेच दूध सहकारी संघाबरोबर चर्चा करून माहिती घेण्याचे काम केले.

## डेअरी धंद्यातील शेतकऱ्याची दुर्दशा

साधारण १० वर्षापूर्वीपर्यंत पुणे जिल्ह्यातल्या नाणेगाव ह्या गावात बहुतेक सर्व शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मालकीची गुरे होती. एकदम जमिनीची किंमत जशी वाढत गेली तसतशी स्वतःचा केवळ फायदा पाहणाऱ्या शहरी व्यावसायिकांना शेतकऱ्यांनी आपली जमीन विकायला सुरुवात केली. ह्या शहरी आक्रमकांनी हळू हळू जमिनीला कुंपण घालायला सुरुवात केली. ह्यामुळे गायराने कमी झाली व बहुतेक सर्व गरीब शेतकऱ्यांनी त्यांची गुरे विकून टाकली. कारण गायराने नसल्यामुळे त्यांच्या जनावरांना चरायला न्यायचे कुठे हा मोठा प्रश्न निर्माण झाला. नाणेगावातील हनुमान पवळे व आणखी दोघेजण यांच्याकडेच फक्त त्यांच्या मालकीची स्वतःची गुरे आहेत व ते एका खासगी व्यापाऱ्याला २३ रुपये लिटरप्रमाणे दूध विकतात. एखाद्या सहकारी संघाला विकले तर त्यापेक्षा व्यापाऱ्याकडून मिळणारी किंमत जास्त आहे. म्हणून दूधाचे उत्पादन कमी होते त्यावेळेस बँकेकडून आणखी कर्ज काढून ते आणखी एक गाय विकत घेतात. दूध विकून येणारे पैसे बँकेचे कर्ज फेडण्यासाठी वापरले जातात. जरासुद्धा इकडे तिकडे करता येणार नाही अशा ताणलेल्या परिस्थितीत हनुमान पवळे काम करतात. त्यांना एकतर उत्पादन केले पाहिजे नाहीतर संपून गेले पाहिजे.

आणखी काही दूधाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांबरोबर बोलताना आमच्या असे लक्षात आले कि अनेक लहान शेतकऱ्यांनी गेल्या काही वर्षांत दूधाचा धंदा सोडून दिला आहे. कारण तो आता फायदेशीर राहिला नाही. राज्यात प्रमाणित दूधाची किमान आधार किंमत (३.५ फॅट) १७ रुपये लिटर अशी ठरवली आहे. जर शेतकऱ्याने सरकारी संघाला दूध विकले तरच त्याला ही किंमत मिळू शकते. दूध उत्पादनाचा खर्च २०–२४ रु. लिटरपेक्षा कमी नसतो. कारण जनावरांचे चारा व खाद्य ह्या अत्यंत खर्चिक बाबी आहेत. पुणे व अहमदनगर जिल्ह्यातल्या कोरड्या हवामानाच्या प्रदेशात बरेचसे दूध उत्पादन होते. २०१३ चा दुष्काळ व त्याचा परिणाम म्हणून मका, शेंगदाणा पेंड, भाताचा कोंडा यासारख्या खाद्यातल्या घटक द्रव्यांच्या वाढलेल्या किंमतीमुळे जनावरांच्या पोषणाचा खर्च प्रचंड वाढला आहे.

दूध व्यवसाय करणाऱ्या ज्या शेतकऱ्यांनी जनावरे विकत घेण्याकरता कर्ज घेतले आहे त्यांना कर्ज फेडण्यासाठी दूध विकावे लागत आहे. जेव्हा दूध उत्पादन कमी होते तेंव्हा ते आणखी कर्ज घेतात व आणखी एक जनावर विकत घेतात. दूध गोळा करणाऱ्या केंद्रावर दूध गोळा करणाऱ्या युनिअन दूधाची सुट्टी घोषित करतात. म्हणजेच आठवड्यातील काही ठराविक दिवशी दूध गोळा केले जाणार नाही असे कळते. अशा वेळी काही शेतकऱ्यांना दूध ओतून तरी टाकावे लागते नाहीतर दुसरे गिऱ्हाईक शोधावे लागते.

दुष्काळी परिस्थिती असली तर दूध व्यवसाय करणे आणखीनच कठीण जाते. एका

गायीमध्ये ४ लिटर दूध तयार होण्याकरता ६ लिटर पाणी लागते. जे शेतकरी दूध विकू शकत नाहीत ते केवळ दूधच नाही तर पाणी टंचाई असलेल्या भागातील पाणी ही किंमती वस्तूही फुकटात फेकून देत आहेत.

दुसऱ्या बाजूने पाहिले तर महाराष्ट्रात बऱ्याच प्रमाणात खासगी गुंतवणूक झाली आहे. बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या दूध उत्पादनाच्या व्यवसायात उतरल्या आहेत. त्यांची नावे ब्रिटानिया, डोनेन, पिझ्झा हट, मेक्डोनाल्ड अशी आहेत. अलिकडेच त्यात नेसले कंपनीचीही भर पडली आहे. प्रश्न असा आहे की कंपन्या आल्यामुळे लहान शेतकऱ्याला त्याच्या दूध व्यवसायात काही मदत होणार आहे का ? त्यांच्या उद्योगाला काही हातभार लागणार आहे का? खर पाहता उत्तर नाही असेच येईल. कारण सरळ आहे. किमान आधार किंमतीपेक्षा ह्या कंपन्या लिटरला १ रुपया जास्त देतात हे ठीक आहे. पण दूध अगदी उत्तम प्रतीचे व त्याची गुणवत्ता उच्च पातळीची असायला पाहिजे ह्यावर त्यांचा खूप भर असतो. गरीब शेतकऱ्याला ह्या गुणवत्ता पातळीपर्यंत पोहोचणे परवडणारे नाही. त्यामुळे तो आहे तिथेच राहतो किंवा चढाओढीत मागे पडतो. त्याचबरोबर अत्यंत मोठ्या व आधुनिक, प्रत्येकी १००० च्या वर गायींची संख्या असलेल्या खासगी डेअरीज अस्तित्वात येत आहेत. मिल्किंग मशीनसारख्या अत्याधुनिक सुविधा त्यांच्याकडे आहेत. ह्या डेअरीज हळूहळू लहान शेतकऱ्यांची जागा घेत आहेत.

## आम्ही काय केले

आम्ही दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या फेब्रुवारी व मार्च २०१३ मध्ये दोन मिटिंग घेतल्या. युरोपिअन महासंघ भारत मुक्त व्यापार कराराचा दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या परिणामांसंदर्भात चर्चा करण्याकरता फेब्रुवारीमध्ये एका मिटींगचे आयोजन केले होते. डॉ. जगजीत प्लाहे, प्राध्यापक – मोनाश विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया व व्यापारातील समस्यांचे तज्ञ, यांनी वरील विषयावर एक सादरीकरण केले. त्यानंतर दूध व्यवसाय क्षेत्रातील समस्यांवर सर्व सहभागी मंडळींनी चर्चा केली. मार्चमध्ये दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांबरोबर पुन्हा चर्चा केली. त्यावेळी त्यांचे प्रश्न व त्यांना वाटणारी काळजी त्यांनी सर्वांसमोर मांडली. त्यावेळी नॅशनल डेअरी प्लॅन डॉक्युमेंटवर पण चर्चा झाली.

## भारतातल्या दूध व्यवसाय क्षेत्राची आजची संरचना

भारत व युरोपिअन महासंघ यांच्यातल्या प्रस्तावित मुक्त व्यापार कराराचा परिणाम म्हणून लहान व परिघाबाहेरच्या समाजातल्या शेतकऱ्यांना कुठपर्यंत पुरवठा साखळीमध्ये सामावून घेतले जाईल किंवा त्यातून वगळले जाईल, त्या सर्व बाबी लक्षात घेऊन कराराचा संभाव्य परिणाम, भारताच्या संदर्भात ही समस्या नीट समजून घेण्याकरता, आम्ही दूध व्यवसाय करणारे शेतकरी, डेअरी कोऑपरेटीवचे सभासद व अधिकारी, नागरी समाज संस्था (सिव्हील सोसायटी ऑर्गनायझेशन) स्थानिक उद्योग, सरकारी अधिकारी, तज्ञ व दूध व्यवसाय क्षेत्रातील संबंधित असलेल्या इतर सर्वांशीही विचारांची देवाण–घेवाण करणार आहोत. ज्यांना त्या प्रदेशाची व भारतीय दूध व्यवसायाशी जोडल्या गेलेल्या गोष्टींची सखोल माहिती आहे अशा व्यक्तींना भेटण्याचे आम्ही योजले आहे.

**डॉ. नित्या घोटगे**
संचालिका, अंतरा, पुणे.

# शेती ही मोठी बाजारपेठ आहे याचे भान शेतकऱ्याला हवे....

भारत हा शेतीप्रधान देश आहे असे आपण म्हणतो तेव्हा येथील बाजारपेठ शेत माल, शेतीसंबंधी उद्योगावर आधारीत आहे याचे भान शेतकऱ्यांना असणे अपेक्षित आहे. त्यामुळे आहे ही बाजारपेठ शेतकरी केंद्रीत, आपल्याशी समतोल, अनुकूल कशी करता येईल याची रणनिती शेतकऱ्यांनी ठरवायला हवी. पण बरेचदा असे दिसते की शेतकरी हे परिस्थितीबद्दल हताश होऊन बाजारपेठ आमची लुबाडणूक करत असल्याचे सांगत राहतात. व्यापारी, दलाल, मध्यस्थ यांच्याकडून होत असलेली अडवणूक ही सत्यस्थिती असली तरी आहे ह्या परिस्थितीतून बोध घेवून उपाय– योजना आखणे हे शहाणपणाचे लक्षण आहे. शेतकऱ्यांची नाना मार्गानी कशी पिळवणूक होते हे महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या **''शेतकऱ्याचा आसूड''** या ग्रंथात सविस्तर लिहीले आहे. पिळवणूक थांबवायची असेल, समस्येतून मार्ग काढायचा असेल तर त्यादृष्टीने कृती होणे गरजेचे आहे.

## चाळीस दिवसांच्या कालावधीत झालेली चार भव्य प्रदर्शने

२०१२ च्या नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये पुण्यात ॲग्रोवन, कात्रज डेअरी आणि महाराष्ट्र शासन यांच्या वतीने तीन प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले. ॲग्रोवनचे प्रदर्शन सिंचन भवनच्या मैदानावर झाले.

ॲग्रोवन हे कृषी विषयावरील पहिले मराठी दैनिक आहे. या प्रदर्शनाला सकाळ माध्यम समूहाने उचलून धरले. मोठ्या प्रमाणात जाहिरात झाल्यामुळे या प्रदर्शनास महाराष्ट्रभरातून आलेल्या शेतकऱ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. कात्रज डेअरीच्या वतीने कात्रज परिसरात दुग्ध व्यवसाय व शेती आधारीत उद्योगांचे प्रदर्शन झाले. त्याचवेळी मोशी येथे महाराष्ट्र शासनाचे किसान प्रदर्शन सुरु झाले. दोन्ही ठिकाणी गर्दीचा महापूर लोटला होता. किसान प्रदर्शनात चीन, हॉलंड, जर्मनी या परदेशातील कंपन्याही सहभागी झाल्या होत्या. पन्नास रुपये तिकीट काढून लांबून आलेले शेतकरी प्रदर्शन पहात होते. आपल्या मनातील प्रश्नांची, गरजांची उत्तरे या प्रदर्शनात मिळतील का हे समजून घेत होते. लोणावळा येथे जिल्हा दूध संघाच्या वतीने जनावरांचे प्रदर्शन भरवण्यात आले. शेळी, मेंढी, गाय, म्हैस आदी जनावरांची मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री येथे झाली. जनावरांच्या विविध जाती, त्यांची वैशिष्ठ्ये, शासनाच्या विविध योजना यांची माहिती या प्रदर्शनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांना मिळाली.

शेतकऱ्याच्या मनात शेतीतून अधिकाधिक मिळवण्याची आस आहे. त्यासाठीच तो गावोगाव धाव घेत आहे. कोणाला कमी पाण्यात शेती पिकवायची आहे. कोणाला सौरउर्जेचा, अपारंपरिक उर्जांचा वापर करुन शेतीवरील खर्च कमी करायचा आहे. कमी क्षेत्रात जास्त पीक घेण्याची आस आणि रोग व कीडीचा नाश यासाठी काय औषध आहे हे तज्ञांकडून समजून घ्यायचे होते. नवीन यंत्रे, अवजारे यांचा वापर शेती विकासासाठी कसा करता येईल हा विचार शेतकऱ्यांच्या मनात येत होता. चारा टंचाई, जनावरे पाळण्यातील अडचणी लक्षात घेता ट्रॅक्टर किंवा छोटे यंत्र घेऊन शेतकरी किसान प्रदर्शनात बैलाला पर्याय शोधत होते. अशी प्रदर्शने ही विचार मंथन आणि नव्या पध्दतीच्या, मार्गाच्या शोधासाठी उपयुक्त ठरतात.

शेती व पूरक उद्योगाची बाजारपेठ किती बहरलेली आहे याचा अनुभव या प्रदर्शनांच्या निमित्ताने आला. शेती हा उद्योग आहे हा विचार लोकांच्या मनावर ठसत आहे. शेतीवर आधारित उद्योजक अधिकाधिक श्रीमंत बनत असताना शेतकरी मात्र अजूनही शेती परवडत नाही असेच बोलतो. शेती फायद्याची करायची तर फायद्याचे मोजमाप काय हे ठरवले पाहिजे. पध्दतशीर शेतीचा अवलंब केला पाहिजे. ही पध्दतशीर शेती कशी असते याबद्दल आमचे काही विचार आहेत. प्रत्यक्ष भेटीत त्यासंबंधी अधिक चर्चा होऊ शकते. अशा चर्चेसाठी आम्ही आपणास निमंत्रित करत आहोत. शेती करताना ती आधुनिक पध्दतीने करायची की नैसर्गिक, पारंपरिक, शाश्वत आदींचा निर्णय शेतकऱ्याने स्वतःच घ्यायचा आहे. पण कोणतीही पध्दती वापरताना आपण या जीव सृष्टीला पुरक ठरेल अशी पध्दत निवडावी असा आग्रह आम्ही नेहमी करतो. विकास सर्वांनाच हवा आहे. पण तो जीवसृष्टीचा नाश करणारा नसावा अशी आमची भावना आहे. नीतीमुल्ये गुंडाळून दुसऱ्यांच्या शोषणावर आधारीत विकास टाळला तर सर्व सुखी होतील असा विश्वास वाटतो.

– जितेंद्र मैड

## त्यांची गोष्टच वेगळी

मार्च महिना हा आंतरराष्ट्रीय महिला दिनासाठी प्रसिध्द आहे. कर्तृत्ववान महिलांचा गौरव, त्यांच्या कार्याला प्रसिद्धी देण्याचे काम या महिन्यात आवर्जून केले जाते. महिला शक्तीच्या कर्तृत्वाचे तोरण आपणही झळकावले पाहिजे या धारणेतून हा लेख लिहित आहे.

आज मी आपल्याला ज्यांची ओळख करून देणार आहे त्यांना मी मावशी या नावाने हाक मारतो. आईनंतर जिला मानाचे स्थान दिले गेले ती मावशी. माझ्या या सर्व मावश्यांमध्ये एक साम्य आहे. ते म्हणजे त्यांचे शिक्षण झालेले नाही. त्या नऊवारी साडी घालतात. जेथे एस टी जात नाही अशा गावात राहतात. पण त्यांच्या विचारांचा आवाका दिल्लीला धडकणारा आहे. छोट्या शेतकरी कुटुंबातील माझ्या मावश्या स्वतःचे, घराचे व शेताचे काम सांभाळून गरीब डोंगरी संघटनेचे काम करतात.

गरीब डोंगरी संघटना ही पुण्याच्या ग्रामीण भागात १९८० पासून काम करणारी संघटना आहे. संघटनेची सुरुवात ही वेल्हे तालुक्याच्या दुर्गम डोंगरी भागात झाली. आपण गरीब आहोत, वंचित आहोत, मागास आहोत, आपला विकास का होत नाही, आपण आपला विकास कसा करू शकतो, आपले हक्क आणि अधिकार काय आहेत, ते आपण विधायक मार्गाने कसे मिळवू शकतो असे प्रश्न घेऊन त्यावर विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे काम संघटनेच्या मिटींगमध्ये होऊ लागले. जे लोक प्रश्न घेऊन आले तेच कार्यकर्ते झाले. स्वतःचे प्रश्न सोडवता सोडवता इतरांचेहि प्रश्न सोडवू लागले. सामुहिक शिक्षण, सामुहिक कृती हा विचार घेऊन संघटनेचे काम उभे राहू लागले. या सर्वांसाठी प्रेरणा होती ती गी प्वात्व्हँ या जन्माने फ्रेंच पण नंतर पुण्यात स्थायिक झालेल्या भारतीय समाज संशोधकाची. पाउलो फ्रेर या प्रख्यात शिक्षण तज्ञाच्या मुक्तीचे शिक्षण या संकल्पनेवर आधारित विचारपद्धती, कार्यपद्धती डोळ्यासमोर ठेवून संघटनेचे काम सुरु झाले. लोकांच्या जाणिवांची पातळी वाढली तर त्यांना आपले प्रश्न सोडवण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज राहणार नाही. बरेचदा मध्यस्थ हेच शोषणाचे माध्यम बनलेले दिसते. त्यामुळे मध्यस्थ ही संकल्पना कशी बाजूला करता येईल यावर संघटनेने वैचारिक भर दिला. आपले

काम गरीब व डोंगरी भागातील लोकांसाठी आहे हे लक्षात घेऊन सर्वांनी संघटनेचे नामकरण गरीब डोंगरी संघटना असे केले. वेल्ह्याबरोबर मुळशी, मावळ, खेड, आंबेगाव, भोर व जुन्नर या डोंगरी भागात संघटनेचे काम वाढले आणि कालांतराने ते शिरुर, इंदापूर, दौंड, पुरंदर व हवेली या सपाटीच्या भागातही पसरले. ही संघटना रजिस्टर केलेली नाही व त्याचबरोबर सर्वांनी ठरवल्यानुसार तिला कोणीही अध्यक्ष नाही. लोकांनी आपले प्रश्न स्वतः सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा. त्यासाठी कोणत्याही पुढारी, दलालाची व मध्यस्थाची गरज पडू नये हे संघटनेचे तत्व.

प्रत्येकाकडे ज्ञान, अनुभव, कौशल्य आहे याची जाण असल्याने संघटनेने त्यातील देवाणघेवाणीला महत्व दिले. पारंपरिक ज्ञान, अनुभव व कौशल्याचा गौरव आपणच केला पाहिजे. त्याचे जतन कसे करता येईल, त्याचा उपयोग कोठे आणि कसा करता येईल या दृष्टीने लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे काम संघटना करते. याच विचारातून घडलेल्या माझ्या मावश्या पुणे जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून दिल्लीपर्यंत आपले विचार पोहोचवून आल्या. त्यांच्या मांडणीची दखल फ्रान्स, जर्मनी, अमेरिका इंग्लंड देशातील अभ्यासकांनी घेतली.

आता एवढे सांगितले पण या महाभागाने या मावश्या कोण असे अजून सांगितले नाही हा प्रश्न तुमच्या मनात उपस्थित होणे साहजिक आहे. ताराबाई उभे, कुसुम सोनावणे, बबाबाई लायगुडे, लीलाबाई कांबळे, मथाबाई भालेसइन अशी या नावांची यादी वाढतच जाईल. यातील एकेका मावशीविषयी मी थोडक्यात माहिती सांगणार आहे.

ताराबाई उभे या कोळावडे, तालुका मुळशी येथील शेतकरी आहेत. त्यांना तीन मुले आहेत. उभे मावशी गेली तीस वर्षे प्रमुख कार्यकर्त्या म्हणून संघटनेचे काम पाहतात. त्यांचे काम पाहून गावाने त्यांना ग्रामपंचायतीवर बिनविरोध निवडून दिले.

महिलांचे, विशेषतः विधवा, परीत्यक्ता, निराधार मुली यांच्या प्रश्नावर उभे मावशीनी काम केले आहे. कोळावडे गावातील पाणी प्रश्न, दलित वस्तीतील पुलाचा प्रश्न लोक सहभागातून सोडवला. शेतीकडे तरुण वर्गाचे झालेले दुर्लक्ष पुढच्या पिढीला अडचणीचे ठरणार हे लक्षात घेऊन त्यांनी मुळशी तालुक्यात शेतकरी मंडळ सुरु करण्यात पुढाकार घेतला. उभे मावशींचे शालेय शिक्षण जेमतेम दुसरीपर्यंत झाले आहे. परिस्थितीमुळे त्यांना शाळा सोडावी लागली. लहानपणीच लग्न झाले. त्या स्वप्रयत्नातूनच लिहायला वाचायला शिकल्या. संघटनेचे काम करताना कुटुंब, समाज, गाव, परिसर एवढेच नव्हे तर सहकारी पुरुष कार्यकर्त्यांकडून पाठींबा मिळाला व अनेकदा महिला म्हणून विरोधही झाला. पण गी बाबा, हेमाताई यांच्या पाठींब्यामुळे त्यांनी आपले कार्य जोमाने सुरु ठेवले. महिला ग्रामसभा, ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक, जमाखर्च यांची माहिती गावकऱ्याना मिळाली पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे. रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड देण्यात टाळाटाळ करणाऱ्यांना, त्यात राजकारण करणाऱ्यांना आपल्या कृतीतून त्यांनी योग्य समज दिली. आज कोळावडे येथे ३३ कुटुंबाना जॉब कार्ड मिळाले आहे. यातील काही प्रश्न हे किरकोळ वाटणे साहजिक आहे परंतु लोकांमध्ये समज निर्माण करून त्यांनीच ते प्रश्न सोडवावेत अशी स्थिती निर्माण करणे सोपे नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

कुसुम सोनावणे ह्या नांदगाव, ता मुळशी येथील दलित शेतकरी कुटुंबातील. शालेय शिक्षण नसतानाही त्या चांगले लिहितात. गौतम बुद्ध, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, आंबेडकरांची पुस्तके वाचण्याचा त्यांना छंद आहे. गाणी रचण्यात त्यांचा हातखंडा आहे.

संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्या म्हणून त्या सुद्धा गेली ३० वर्षे काम करत आहेत. त्यांचे पती मुकुंद सोनावणे यांनी त्यांना संघटनेच्या कामासाठी नेहेमीच पाठिंबा दिला. पतीच्या निधनानंतरही मावशींनी जोमाने काम केले. विधवेने, त्यातही दलित स्त्रीने पुढारपण करणे योग्य नाही असा समज असलेल्या समाज व्यवस्थेत ठामपणे उभे राहून काम करणाऱ्या सोनावणे मावशी सर्वांच्या आवडत्या आहेत. त्यांचे काम पाहून गावाने त्यांना बिनविरोध ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून दिले. सदस्य होताच त्यांनी पहिला प्रश्न हाती घेतला तो वस्ती व गाव जोडणाऱ्या रस्त्यांचा. त्यांच्या अथक प्रयत्नातून रस्त्याला मान्यता मिळाली. प्रांत, तहसीलदार यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन झाले.

लीलाबाई कांबळे मावशी या कोळावडे, ता. मुळशी येथील दलित, अल्पभूधारक शेतकरी. उभे मावशी व कांबळे मावशी यांची जोडगोळी मुळशी तालुक्यात प्रसिद्ध आहे. दलित स्त्री व मराठा स्त्री एकत्र काम करताहेत, बहिणीबहिणीसारखे वागताहेत ही बाब अनेक लोकांना खटकणारी होती. पण सर्वांचा विरोध डावलून या दोघी एकत्र काम करत आहेत. यांचेही शालेय शिक्षण शून्य. पण हक्काच्या प्रश्नासाठी लढण्याची धमक सुशिक्षित माणसालाही लाजवणारी आहे. यांनी पेन चालविला तो फक्त सही करण्यापुरता. मिटींगची टिपणे त्या एखाद्या कार्यकर्त्याचा व शालेय मुलाच्या मदतीने घेतात. शिक्षण नाही म्हणून अडून बसायचे नाही. अनेक परीत्यक्तांचे संसार पुन्हा उभारण्यात कांबळे मावशींचा पुढाकार आहे.

बबाबाई लायगुडे या अजिवली, ता. मावळ येथील शेतकरी कुटुंबातील विधवा. या सुद्धा निरक्षर आहेत. सही मात्र करता येते. त्यांना तीन मुली आहेत. एकीचे लग्न झाले, दोन मुली पुणे येथे शिक्षण घेत आहेत. अजिवली येथे शिक्षणाची संधी नाकारलेल्या १४ मुलींना शिक्षणासाठी संपूर्ण पाठींबा देण्याचे काम त्या करत आहेत. कोणत्याही अन्यायाविरुध्द पेटून उठण्याची त्यांची धमक सर्वांना प्रेरणादायी आहे. त्यांचे कार्य पाहून सकाळ सोशल फौंडेशनतर्फे त्यांना आदर्श माता पुरस्कार २००९ मध्ये दिला. २०१० मध्ये वनमंत्री पतंगराव कदम यांच्या आईच्या नावे देण्यात येणारा आदर्श माता पुरस्कार तत्कालीन महसूल मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते त्यांना सांगली येथे देण्यात आला. त्यांचा कणखर आवाज भल्याभल्यांना घाम फोडतो. संघटनेच्या मुख्य कार्यकर्त्या म्हणून काम करणाऱ्या बबाबाईनी आपल्यासारख्या अनेक महिलांना जगण्याचे बळ दिले. लढण्याची प्रेरणा दिली. मुलींना आईची माया दिली.

मथाबाई भालेसइन या महागाव, ता मावळ, येथील दलित शेतकरी कुटुंबातील. निरक्षर असल्या तरी त्यांनी महिलांचा गट उभारून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. मावळ तालुक्यातील महिलांच्या प्रश्नासाठी त्यांनी सामुहिकपणे वेळोवेळी आवाज उठविला आहे.

माझ्या या सर्व मावशांची अतिशय त्रोटक माहिती मी येथे सांगितली आहे. तुम्हाला जर त्यांच्याबद्धल अधिक जाणून घ्यायचे असेल, त्यांच्याशी संवाद साधायचा असेल तर आम्हाला कळवा. ही संधी तुम्हाला अवश्य मिळेल.

– जितेंद्र मैड

❖❖

## अंतरातील घडामोडी

१. १७ जानेवारी २०१३. हेन्री पेक ह्या ब्रिटीश रेडिओच्या संवाददात्याची अंतराच्या कामाबद्दल माहिती घेण्याकरता खास भेट
२. २१–२२ जानेवारी २०१३. कल्पवृक्ष, पुणे व टाटा समाजशास्त्र संस्था, मुंबई यांनी मुंबई येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत

डॉ. नित्या घोटगे यांचे वनहक्क कायदा व धनगरांचे अनुभव या संबंधीचे सादरीकरण

३. २३–२४ जानेवारी २०१३, पाबळ येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन, ७० शेतकऱ्यांचा सहभाग, कुमार ओव्हाळ, इनोरा कार्यकर्ते यांनी प्रात्यक्षिकासह गांडूळखताची माहिती दिली

४. २७ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०१३ डॉ. जगजीत प्लाहे, लेक्चरर मोनाश विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया यांची अंतराशी संपर्क असलेल्या लहान पशुपालकांना भेट व चर्चा तसेच त्यांनी अंतराच्या सहकार्याने यशदा, पुणे इथे युरोपिअन महासंघाबरोबर मुक्त करार झाला तर दुग्ध व्यवसायावर होणारे संभाव्य परिणाम याबाबत माहिती दिली. यावेळी पशुपालक, पशुसंवर्धन खात्याचे पदाधिकारी, तज्ञ, जेष्ठ पशुवैद्यक संघटनेचे प्रतिनिधी, BAIF, महानंद व कात्रज दूध संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

५. ८ मार्च २०१३, कोळावडे येथे महिला दिन साजरा. मिझेरीओर, जर्मनीच्या वीरा रोबेर्ट यांचा सहभाग.

६. २४ एप्रिल २०१३, कॅथरीन व्हॅन हूफ, नेदरलँड्स यांची अंतराला भेट, नेदरलँड्स व भारत या दोन देशातील दूध व्यवसायाबद्दल चर्चा, कात्रज डेरी, अंतरा, जेष्ठ पशुवैद्यक संघटना, गोमुख इत्यादींचा सहभाग

७. पावसाळा सुरु झाला की धनगरांची जी स्थलांतराची प्रक्रिया चालू होते तिच्यावर डॉक्युमेंट्री तयार करण्याकरता बी बी सी, इंग्लंडहून मुद्दाम एक टीम आली होती. ह्यामध्ये ठाणे जिल्ह्यातल्या डहाणूपासून अहमदनगरमधल्या ढवळपुरीपर्यंतच्या स्थलांतराचा समावेश आहे. ह्या कामात अंतराचा सक्रीय सहभाग होता.

❖❖



**बुक-पोस्ट**

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : **anthra.pune@gmail.com**
वेबसाईट : **www.anthra.org**